महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
# वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१

ई-मेल : textilecomm.ng-mh@gov.in
संकेतस्थळ : www.dirtexmah.gov.in
दूरध्वनी: ०७१२ २५६ १२४७
फॅक्स : ०७१२ २५२६४०८

## महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंर्तगत वीजदर सवलत मिळणाऱ्या यंत्रमाग घटकांची आयुक्तालयाचे संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ३ महिन्यांची अंतिम मुदत देण्याबाबत.

शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर २०१८ अन्वये राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत वस्त्रोद्योग घटकांना वीजदर सवलत लागू करण्यात आलेली आहे. वीजदर सवलतीस पात्र असणाऱ्या यंत्रमाग घटकांना आयुक्तालयाच्या https://www.dirtexmah.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम मुदत दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत देण्यात आलेली होती. याबाबत यंत्रमाग घटकांच्या संघटना तसेच लोकप्रतिनीधी यांनी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर मुदत दिनांक ३१ मे २०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. परंतु, या मुदतीत देखील बहुतांश यंत्रमाग घटकांनी नोंदणी केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे सर्व प्रकारच्या यंत्रमाग घटकांना ऑनलाईन तसेच शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ अन्वये २७ अश्वशक्तीपेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमाग घटकांना ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापैकी कोणत्याही प्रकाराने नोंदणी अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. सदर अर्ज नोंदणी करण्यासाठी दिनांक ०२/०९/२०२१ च्या शासन पत्रान्वये १ महिन्याची अंतिम मुदत देण्यात आली होती. या मुदतीत देखील बहुतांश प्रकल्पांनी नोंदणी केलेली नसल्याने शासन पत्र दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ अन्वये या उद्योगांना नोंदणी करण्यासाठी शेवटची तीन महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सबंधीत यंत्रमाग घटकांनी सदर मुदतीच्या आत आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन किंवा ऑफलाईन (२७ अश्वशक्तीखालील घटक) नोंदणी करणे आवश्यक आहे, असे शीतल तेली-उगले, भा.प्र.से. आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविले आहे.

--